स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

सामाजिक शाखे अतंर्गत इतिहास विषयातील विद्यावाचस्पती (पि.एच.डी.) पदवीसाठी सादर करावयाचा संशोधन आराखडा

प्रस्तावित

संशोधन आराखडा

(RESEARCH OUTLINE)

विषय

“मराठवाडा विद्यापिठाच्या नामांतर चळवळीत नांदेड जिल्ह्याचे योगदान - एक ऐतिहासीक अभ्यास”

“Contribution of Nanded District the movement to change the Name of Marathwada university. A Historical study”

संशोधक

सोनकांबळे राजू सायलू

(एम.ए.,एम.एड.,एम.फिल.)

मु.पो.बिलोली ता.बिलोली जि.नांदेड

मो.क्र. - ९०४९६६८३५८

ई - मेल - raju.sonkamble२०१३@gmail.com

मार्गदर्शकाचे नांव

प्रा.डॉ.बलखंडे एस.पी.

सहाय्यक प्राध्यापक व संशोधक मार्गदर्शक

कै.बाबुराव पाटील महाविद्यालय, हिंगोली (इतिहास विभाग प्रमुख)

मो.क्र. ९०२८९९२३५८

ई-मेल - **spbalkhande@gmail.com**

<u>संशोधन आराखडा प्रकरण विभागणी</u>

१) विषय (Subject) :- "मराठवाडा विद्यापिठाच्या नामांतर चळवळीत नांदेड जिल्ह्याचे योज्दा-ा - एक ऐतिहासिक अभ्यास"

"Contribution of Nanded District the movement to change the Name of Marathwada university. A Historical study"

२) प्रस्तावना :-

महाराष्ट्राची भूमी भारतातील इतर घटकराज्यापैकी वेगळी वैशिष्ठ्य असणारी आहे इतर राज्यापेक्षा महाराष्ट्राला सांस्कृतिक व ऐतिहासीक वारसा लाभलेला आहे. साधुसंत , सुधारक , नेते , कर्तृत्वान महापुरूषाचा प्रदेश मानला जातो.

सामाजिक धार्मिक राजकीय वैज्ञानिक ऐतिहासिक अशा विविध क्षेत्रांमध्ये उत्तुंग ज ार्य करणाऱ्या महापुरूषांची ही भुमी संत नामदेव , ज्ञानेश्वर, संत चोखोबा, संत तुकाराम अशा अनेक संताची हीच कर्मभुमी याच भुमी मध्ये छत्रपती शिवाजी महाराज , राजर्षी शाहु महाराज यांच्यासारखे लोककल्याणकारी राजे होवुन गेले तर याच भुमीत म.फुले, लोक हितवादी , रानडे , आगरकर , शिंदे, राजर्षी शाहु महाराज , डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्यासारखे अनेक सुधरकांनी महाराष्ट्राला व देशाला घडविले. राजकीय संघर्षासाठीही हा प्रदेश वैशिष्ठ्यपुर्ण ठरतो.भारतीय स्वातंत्र्यासाठी झालेली आंदोलनांमध्ये या प्रदेशाचे योगदान आहे. देशाच्या स्वातंत्र्य लढ्यातील प्रमुख व महत्वाची संघटना कॉंग्रेस. या संघटनेची स्थापना

महाराष्ट्रातच झाली तर स्वातंत्र्य लढ्यातील अतंत्य परिणामकारक व शेवटचे आंदोलन १९४२ चे चले जाव चळवळ येथुनच सुरू झाली.

अशा राजकीय चळवळी बरोबर या प्रदेशामध्ये सामाजीक चळवळी झाल्या. समाजपरिवर्तनाच्या आणि समता प्रस्तवित करण्यासाठीही येथे अनेक चळवळी झाल्या. म्हणुनच ही भुमी संघर्षाची भुमी म्हणुनही ओळखली जाते.

वेगवेगळ्या मुलांसाठी , हक्कासाठी, समता प्रस्थापित व्हीवी यासाठी येथे अनेक आंदोलने , चळवळी झाल्या. अशी एक महत्वपुर्ण आंदोलन चळवळ म्हणजे नामांतर चळवळ. औरंगाबादच्या मराठवाडा विद्यापिठाला डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव द्यावे यासाठी येथे १९७८ ते १९९४ जवळपास सतरा अठरा वर्ष येथील जनतेने सरकारशी आणि येथील प्रस्थापित प्रतिगामी लोकांशी संघर्ष केला. लोकचळवळ उभारली गेली. दलित आणि आंबेडकरवादी लोकांच्या अस्मीतेची ही चळवळ बनली होती. या नामांतर चळवळ औरंगाबादच मराठवाडा विद्यापिठाला डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव द्यावे.

यासाठी येथे १९७८ ते १९९४ जवळपास सतरा अठरा वर्ष येथील जनतेनी सरकारशी आणि येथील प्रस्थापित प्रतिगामी लोकांशी संघर्ष केला. लोकचळवळ उभारली गेली. दलित आणि आंबेडकरवादी लोकाच्या अस्मतेची ही चळवळ बनली होती.या नामांतर चळवळीच्या विविध पैलुचां अभ्यास महत्वाचा आहे.

अस म्हणतात की जो समाज,जो देश आपला इतिहास विसरतो त्या समाजाचे , देशाचे भविष्य अंधकारमय असते.

म्हणुनच आजच्या पिढीला आणि येणाऱ्या पिढीला त्यांच्या उज्वल भविष्य घडविण्यासाठी इतिहासाची मदत होत असते आधार घ्यावा लागतो. जगण्याची, कर्तृत्वाची आणि भविष्यासाठी प्रेरजा मार्गदर्शन इतिहासामुळे मिळत असते. म्हणुन इतिहास मार्गदर्शक असतो. आजची पिढी ज्या परिस्थितीमध्ये , वातावरणामध्ये जगत असते ती परिस्थिती, वातावरण निर्माण करुन देण्यामध्ये समाजाचे , पुर्वजांचे मोठे योगदान असते. म्हणुन त्यांनी केलेल्या संघर्षाची योगदानाची माहीती नवीन पिढीस असणे आवश्यक ठरते.

त्या अनुशंगाने महाराष्ट्रामध्ये जी अनेक क्षेत्रामध्ये विविध आंदोलन चळवळी झाल्या त्यामधील एक अभुतपुर्व चळवळ म्हणजे औरंगाबदच्या विद्यापिढास डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्यासाठी उभारलेली चळवळ. जीला विद्यापिठ नामांतर चळवळ असे संबोधले जाते. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडज्र यांचा मराठवाडा विद्यापिठ , औरंगाबाद आणि विशेषतः औरंगाबादचे मराठवाडा विद्यापिठ ज्या परिसरामध्ये आहे त्या परिसराचा वैशिष्ठ्यपूर्ण संबंध होता.म्हणुन महाराष्ट्रातील

आंबेडकर अनुयायांनी औरंगाबादच्या मराठवाडा विद्यापिठास डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव द्यावे अशी मागणी केली व त्यासाठी सतरा अठरा वर्ष संघर्ष केला. चळवळ उभारली ही मागणी नंतर चळवळ बनली आणि तीही अस्मितेची. यामध्ये विविध संघटना,नेते,पक्ष आणि

समाज घटकांचा सहभाग होता. या चळवळीमध्ये अनेकांना कारावास, तुरुंग , शिक्षा झाल्या. अनेकांचे संसार उध्वंस्त झाले अनेकांना प्राणांचे बलीदान द्यावे लागले. हौतात्म्य प्राप्त झाले. १९९४ पर्यंत आंबेडकर अनुयायी पुरोगामी पक्ष,संघटना,व्यक्ती,सहभागी होत्या. सभा,मोर्चे,बंद,संप,हरनाळ,सत्यागृह निदर्शने अशा अनेक लोकशाही मार्गाने ही चळवळ वाढत जेली.

राज्याच्या विधान सभेमध्ये यास मान्यता मिळाली पण काही प्रतिगामी लोक , समाज , संस्था यांच्या विरोधामुळे या निर्णयाची अमलबजावणी लगेच किंवा सहज झाली -ााही. त्यासाठी महाराष्ट्रीतील जनतेला ही प्रदिर्घ चळवळ उभारावी लागली ही चळवळ महाराष्ट्रभर पसरली. महाराष्ट्रातील एकही गाव, खेडे याच्या प्रभावापासुन सुटले नाही.

दलितांनी आणि दलितेदारांनी ही या चळवळीत सहभाग घेवुन व्यापक बनवली. काही जातीयवादी लोकांनी , समाजांनी यास विरोध केला. हिंसा, हत्याकांड घडवुन आणले पण ही चळवळ बंद झाली किंवा थांबली नाही. शेवटी १९९४ ला मराठवाडा विद्यापिठास डॉ.बाबासाहेब आंबेडकर नाव देण्यात आले. ही संपुर्ण चळवळ दलितांच्या ,

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या अनुयायांच्या दृष्टिने अंत्यत महत्वाची ठरली. या चळवळीदरम्यान महाराष्ट्रातील सनातनी हिदुंनी, प्रतिगामी लोकांनी , राजकारनांनी आणि समाजघटकांनी हौदोस घातला. दलित, अस्पृश्य , विशेषत: बौध्द बदलचा तिरस्कार, राग त्यांनी व्यक्त केला.दलितांचे घरे , वस्त्या , गावे जाळली गेली. व्यक्तींना जीवंत जाळले ,

दलित स्त्रियांवर अत्याचार कले या सर्व यातना , छळ , हल्ले डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या अनुयांयानी सहन केले पण मागे हटले नाही. म्हणुन ही चळवळ अनेक दृष्टिने महत्वपुर्ण ठरते. या चळवळीचा , संघर्षाचा परिपुर्ण अभ्यास करावा या चळवळीचे अनेक पैलु समोर आणावे आणि विशेषत: नांदेड जिल्ह्यामध्ये या चळवळीचे स्वरुप काय होते. या संदर्भाने अभ्यास ज रण्यासाठी हा विषय महत्वाचा ठरतो.

३) उद्दिष्टे :-

मराठवाडा विद्यापिठ नामांतर चळवळीत नांदेड जिल्ह्याचे योगदान या अनुशंगाने ज रावयाच्या संशोधन विषयाची उद्दिष्टे खालीलप्रमाणे आहेत.

१) महाराष्ट्र मराठवाडा याचा सामाजीक राजकीय इतिहासाच्या आढावा घेणे.

२) महाराष्ट्रात निर्माज झालेल्या सामाजिक समतेच्या चळवळीचा अभ्यास करणे.

३) डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि मराठवाडा यांचा संबंध अभ्यासणे.

४) डॉ.बाबासाहेब आंबेडकर व मराठवाड्याच्या शैक्षणिक क्षमतेतील योगदान अभ्यासजे.

५) मराठवाडा विद्यापिठाची ऐतिहासीक पार्श्वभुमी अभ्यासणे.

६) मराठवाड्यातील दलित चळवळीचा अभ्यास करणे.

७) मराठवाडा विद्यापिठ नामांतर चळवळीत सहभागी व्यक्ती,संघटना,पक्ष,संस्था यांची भुमिका अभ्यासणे

८) नामांतरवादी व नामांतर विरोधी यांच्यात झालेल्या संघर्षाचा अभ्यास करणे.

९) या संदर्भात शासनाच्या भुमिकेचा अभ्यास करणे.

१०) नामांतर चळवळीचे दलितांच्या सामाजिक , राजकीय ,आर्थिज जीवनावर झालेले परिणाम यांचा अभ्यास करणे.

११) या चळवळीचा नांदेड जिल्ह्यातील आंदोलनाचा अभ्यास करणे.

१२) नांदेड जिल्ह्यात या आंदोलनाचा पडलेला प्रभाव अभ्यासणे.

१३) नामांतर चळवळीत नांदेड जिल्ह्यात झालेले सत्याग्रह,मोर्चे,आदी घटनांचा अभ्यास ज रजे.

१४) नांदेड जिल्ह्यातील नामांतर विरोधी लोकांच्या विरोधाचा अभ्यास करणे त्यामागची पार्श्वभुमी,तथा त्यांची मानसिकता याचा अभ्यास करणे.

४) गृहितके :-

१) भारतीय समाज प्राचिन काळापासुन भेदग्रस्त समाज आहे.

२) दलित अस्पृश्याची समाज अवस्थेत दयनिय स्थिती होती.

३) डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी या समाजात आत्मसम्मान व स्वाभिमान जागृत केला.

४) विविध आंदोलनांच्या माध्यमाने डॉ.बाबासाहेबांनी दलितांसाठी विकासाचा महामार्ग तयार केला.

५) १९५६ ला डॉ.बाबासाहेब आंबेडकराच्या नेतृत्वाखाली व मार्गदर्शनाखाली असंख्य दलितांनी हिंदु धर्म सोडुन बौध्द धर्म स्विकारला.

६) दलितांमधील आत्मसम्मान स्वाभिमान व प्रगती यामुळे सर्वांच्या मनामध्ये दलितांबद्दल आकस निर्माण झाला.

७) मराठवाडा औरंगाबाद आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा सतत सपंर्क होता.

८) मराठवाड्यातील शैक्षणिक मागासलेपण दुर करण्यासाठी औरंगाबादला मिलिंद विद्यालय स्थापन केले. बाबासाहेबांनी स्थापन केलेले मिलिंद कॉलेज व नागसेन परिसर क्रांतीभूमी मानला जाते.

९) मराठवाडा विद्यापिठास डॉ.बाबासाहेबाचे नाव द्यावे अशी मागणी समोर येते.

१०) सरकारही अनुकूल विधीमंडळाचा ठराव सम्मत होतो.

११) मराठवाडा महाराष्ट्रातील प्रतिगामी लोक,संघटनाकडुन या मागणीस निर्णयास विरोध.

१२) ठरावाची अमलबजावणी व्हावी यासाठी १६ - १७ वर्ष संघर्ष.

१३) विविध मार्गाने नामांतराची चळवळ सुरू होती.

१४) या चळवळीत दलिताप्रमाणेच दलित्तोर लोकही सहभागी.

१५) शेवटी १९९४ ला विद्यापिठाचे नामांतर नामविस्तार

१६) नांदेड जिल्ह्यात ठिकठिकाणी आंदोलने, जाळपोळ व जातीय दंगली निर्माण झाल्या.

१७) नांदेड जळकोट नायगांव आदी ठिकाणी नामांतरासाठी युवकांनी बलिदान दिले.

५) संशोधन पद्धती :-

प्रस्तुतच्या संशोधनासाठी संशोधकाने विशिष्ट संशोधनपद्धतीचा अवलंब केला. ज्यामध्ये संशोधनाची सर्वेक्षण पद्धती, ऐतिहासीक पद्धती , मुलाखत पद्धती तसेच प्रश्नावली पद्धती या पद्धतींचा अवलंब केला. शिवाय संदर्भीय विषयानुसार प्राथमिक व दुय्यम साधनांसाठी ग्रंथालयीन पद्धतीचाही अवलंब केला.

६) संशोधनाची मर्यादा व व्याप्ती :-

सदरील विषयांची व्याप्ती आणि कार्यक्षेत्र व्यापक आहे परंतु संशोधकाने नामांतर चळवळीचा अभ्यास करण्यासाठी केवळ नांदेड जिल्ह्यातील नामांतर चळवळ ही मर्यादा हरवुन १९७८ - १९९४ ह्या कालावधीमध्ये मराठवाडा विद्यापिठ औरंगाबादच्या नामांतर चळवळीमध्ये नांदेड जिल्ह्याची क्षेत्र मर्यादा निश्चित केली.

मधील नामांतर चळवळ ही क्षेत्रमर्यादा संशोधनासाठी घेतली आहे.

७) तथ्य संकलन व विश्लेषण :-

प्रस्तुतच्या संशोधनाचा अभ्यास करण्यासाठी नांदेड जिल्ह्यातील वेगवेगळ्या ठिकाणाहुन प्राथमिक व दुय्यम संशोधनाचे संकलन केले. मराठवाडा विद्यापिठाच्या नामांतर चळवळीसी

प्रत्यक्ष अप्रत्यक्ष संबंधीत असेलेल्या लोकांशी, त्यांच्या परिवाराच्या सदस्यांच्या भेटी घेवुन त्यांच्या मुलखती घेतल्या त्यासाठी प्रश्नावलीचा अवलंब केला. या मार्गाने संदर्भीय विषयानुसार माहितीचे संकलन केले. व संकलन केलेल्या माहितीचे विश्लेषण केले.

८) संशोध-ा प्रज रज विभाज्जी

सदरील संशोधन विषयाची प्रकरण विभागणी खालीलप्रमाणे आहे.

१) प्रस्तावना :-

महाराष्ट्राच्या भुप्रदेशाला प्राचिन,सांस्कृतिक,ऐतिहासीक वारसा लाभला आहे. या प्रदेशावर वेगवेगळ्या घराण्याच्या सत्ता होत्या. १८१८ ला हा प्रदेश इंग्रजांच्या अमलाखाली आला. महाराष्ट्राचा काही प्रदेश हैद्राबादच्या निजामाच्या अधिपत्याखाली होता. ब्रिटिश राजवटीचे परिणाम येथील सामाजीक, धार्मिक,आर्थिक जीवनावर झाले. देशात निर्माण झालेली सामाजीक सुधारकांची फार मोठी चळवळ येथे उभारली. महाराष्ट्राचा प्रदेश संघर्षाचा प्रदेश.येथे समतेच्या चळवळी निर्माण झाल्या. त्यामध्ये मराठवाडा विद्यापिठ औरंगाबाद या विद्यापिठास डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव द्यावे यासाठी येथील दलित जनतेने व आंबेडकर अनुयायांनी प्रदिर्घ संघर्ष केला. नामांतराची ही चळवळ संपुर्ण महाराष्ट्रभर व देशातही पसरली.

विशेषतः मराठवाड्यातील नांदेड जिल्ह्यात ही चळवळ अधिक तीव्र स्वरुपात झ ाली. नांदेड जिल्ह्यातील खेड्या पाड्यातील लोक या चळवळीत उतरले. या प्रसंगी सवर्ण व प्रतिगामी लोकांनी या मागणीस विरोध केला. यातून दलित व सवर्ण असा वाद झाला.

दलितांवर अन्याय अत्याचार झाले. तरी पण ही चळवळ दलितांनी सूरूच ठेवली. १६ - १७ वर्षाचा प्रदिर्घ संर्घषानंतर १९९४ ला औरंगाबादच्या मराठवाडा विद्यापिठास डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे नाव मिळाले. या विद्यापिठास डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापिठ असे नाव देण्यात आले.

प्रज रज - २ रे

मराठवाड्यातील सामाजिक परिस्थीती आणि भेदग्रस्त समाज :-

प्रस्तुत प्रकरणाला अनुसरून पी.एच.डी.संशोधनाचा अभ्यास करीत असतांना भारतात प्राचिन काळापासुन ते उत्तर आधुनिक काळापर्यंतच्या इतिहासात समाज जीवनावर जीतीव्यवस्थेचा नेहमी राहीलेला आहे. तर ह्या जातीव्यवस्थेच्या समाज जीवनातील होणारा परिणाम म्हणजे सर्वागिण सामाजिक विकासास पडलेली एक अडथळ्यात्मक खीळ होय. मराठवाड्यात स्वात्र्योत्तर काळातील समाजव्यवस्थेकडे पाहील्यास मराठवाड्यात अनेक जाती, धर्माचे लोक नांदत होते ज्यात मराठा,ब्राम्हण, मुसलमान,दलित यासारख्या जाती असुन हिन्दु ,मुसलमान,बौद्ध,शिख,पारशी,इत्यादी धर्माचे लोक होते. ह्या विविध जाती धर्माच्या लोकांची सामाजीक,आर्थिक व राजकीय परिस्थिती ही अत्यंत निकृष्ट पद्धतीची होती. थोडक्यात भारतात जातीव्यवस्था म्हणजे भारतीय समाजाचे एक महत्वाचे वैशिष्ट्ये आहे.

भारतातील ह्या जातीव्यवस्थेच्या संदर्भात डॉ.अनिल शिंगारे यांनी ‘‘आपल्या महाराष्ट्रातील आंबेडकर चळवळीचा इतिहास’’ या ग्रंथात - ‘‘जात म्हणजे जी कधी जात नाही ती जात’’ अशा हेटाळणी युक्त शब्दात त्यांनी नमुद केले. अशा विविध जाती धर्माबद्दल विवेचन ज्रीत असतांना आणखी एक महत्वपुर्ण वैशिष्ट्ये किंवा पैलु म्हणजे ह्या

मराठा,ब्राम्हण,मुसलमान,दलित इत्यादी जातींपैकी मराठा,ब्राम्हण ह्या जातीचे राजकारण आणि राजकीय परिस्थिती अतिशय चांगली होती. तर मुसलमान ह्या जातींची सर्वागिंण परिस्थिती अतिशय खलावलेली व दैनी अवस्थेची होती. त्याचबरोबर दलित वर्गाची परिस्थिती ही अतिशय चिंताजनक असुन त्यांच्या संदर्भात अमानवी असे ‘‘अस्पृश्यता’’ हे तत्व जातीत जन्म घेतानाच जोडलेले असल्याचे लक्षात येते. अशा जाती-धर्माच्या अनेक भेदभावात्मक तसेच एकमेकांच्या जाती-धर्माबद्दल असलेले मनातील द्वेषभवात्मक जातीव्यवस्थेचे स्वरुप मराठवाड्यात अस्तित्वात होता म्हणुनच प्रस्तूत प्रकरणात मराठवाड्यातील सामाजिक परिस्थिती अभ्यासत असतात. येथील भेदग्रस्त व्यवस्थेचे विवेचन प्रस्तुत प्रकरणात करण्यात येणार आहे.

प्रज रज - ३ रे

मराठवाड्यातील शैक्षणिक परिस्थिती व डॉ. बाबासाहेब आंबेडकर :-

१९४८ अगोदर निजाम राजवटीअंतर्गत येणाऱ्या मराठवाडा हा प्रदेश एक निजाम रावटीचा होता. तर मराठवाडा ह्या प्रदेशात शिक्षणाची पायाभरणी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी ज़ेली. ज्या अनेक समाजसुधारकांच्या विभुतीत डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे नाव म्हणजे, व्यक्तीत्व म्हणजे त्यांच्या नजरेत असलेल्या भारतातील दलित दीन लोकांचा उन्नत्तीचा असलेला एक महत्वाचा मुलमंत्र होय. ज्या मुलमंत्रास समाजाच्या विकासात उभारविण्याकरीता त्यांनी स्वःत आहेरात्र आहे त्या परिस्थितीत घेतलेले शिक्षण म्हणजेच डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी भारताच्या समाजातील प्रत्येक व्यक्तीस दिलेला ज्ञानाचा तिसरा डोळा होय. म्हणुनच प्रस्तूत प्रकरणात स्वातंत्र्यपुर्व मराठवाड्यातील सामाजीक राजकीय परिस्थिती आणि शैक्षणिक परिस्थिती व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य महत्वपुर्ण विश्लेषणास अनन्य साधरण महत्व आहे.

"डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि शिक्षण" ह्या संदर्भात अध्ययनात्मक विवेचन ज़रीत असतात. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक,राजकीय,धार्मिक,आर्थिक,शैजणिक,वैचारीक आणि तात्वीक भुमिका व कार्य

अभ्यासणे महत्वपुर्ण ठरते. ज्यात मराठवाडा हा प्रदेश निजाम राजवटीअंतर्गत असल्या कारणाने अशा जुलमी राजवटीत शिक्षणास फारसे महत्व नव्हते. त्याच कारणाने आंबेडकरांच्या पुर्वी येथील शैक्षणिक परिस्थिती फार मागास असुन लोकांना या शिक्षणाचे महत्व आणि त्याच्या फायद्या बद्दल काहीच ज्ञात नव्हते. अशा शैक्षणिक दृष्ट्या मागासलेल्या मराठवाड्यात औरंगाबाद,अंबाजोगाई, नांदेड , उस्मानाबाद अशा इत्यादी ठिकाणी शाळा अस्तित्वात होत्या मात्र उच्च शिक्षणाचे येथे एकही महाविद्यालय येथे नव्हते. अशा शैक्षणिक / मराठवाड्यातील शैक्षणिक परिस्थिती, अवस्थेत डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या कार्याने मराठवाड्यात शिक्षणाची पायाभरणी केली. ज्यात औरंगाबाद येथे मिलिंद महाविद्यालयाची स्थापना करुन मराठवाड्यातील दलितांना व सर्व समाजातील घटकांना उच्च शिक्षणाची तजवीज करुन दिली. या उच्च शिक्षणाच्या कार्यात त्यांनी निजाम राजवटीची मदत घेतली असुन स्वातंत्र्यानंतर मराठवाड्यात १९५६ ला मराठवाडा विद्यापीठ स्थापन करण्यात आले.

प्रज रज - ४ थे

नामांतराची चळवळ आणि विविध संघटना :-

महाराष्ट्रात प्रथमतः शिक्षणाचे बीज महात्मा फुले यांनी पेरले आणि ह्याच शिक्षणाच्या प्रेरणेतुन अनेक व्यक्तीत्व पुढे आले. त्यामुळेच भारतीय समाजसुधारकांनी “शिक्षणास समाज परिवर्तनाचे साध-ा” मानले होत. व हे चुकीचे सुद्धा नव्हते कारण ह्याच शिक्षण प्रणालीतुन डॉ.बाबासाहेब आंबेडकरांसारखे महापुरूष निर्माण झाले आहेत. ज्यांनी आपल्या कर्तव्या, कार्यामुळेच आपल्या मरणोत्तर सुद्धा शिक्षणाचा वसा पुढे चालूच ठेवला असे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी सिद्ध करून दाखविले.

१९५६ ला डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे निधन झाले तर १९५८ ला मराठवाडा विद्यापिठाची स्थापना झाली. मराठवाड्यात विद्यापिठाची स्थाप-ाा झाली असली तरी महाराष्ट्रात आंबेडकरोत्तर कालखंडात मराठवाडा विद्यापिठाला “डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्यात यावे अशी केलेली मागणी म्हणजेच नामांतर चळवळ होय.”

मराठवाडा विद्यापिठास डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे नाव द्यावे अशी मागणी त्यांच्या अनुयायांनी केली असली तरी ही मागणी करण्या संदर्भातील महत्वाचे कारण म्हणजे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे “शैक्षणिक वाटचालीतील जीवनवाटचाल” मागास असलेला

मराठवाड्यात उच्च शिक्षणाची पायाभरणी अशा मागास मराठवाड्यातील दीन,दलित समाज घटक शिक्षणाअभावी स्वतःच्या विकासापासुन कौसोभर दुर होता हे डॉ.आंबेडकरांनी लक्षात घेतले व त्या संदर्भात त्यांनी मुंबईस सिद्धार्थ तर औरंगाबादला मिलिंद महाविद्यालयाची स्थापना जेली.म्हणुनच आजही मराठवाड्यातील प्रत्येक समाजघटकांनी आपली केलेली शिक्षणात्मक वाटचाल ही केवळ डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची देण असुन त्याच विचारांनी प्रेरित होवुन त्यांच्या अनुयायांनी विद्यापिठाच्या नामांतर चळवळीस पाठपुरावा दिल तर सरकारकडे मागणी केली.

या नामांतर चळवळीत अनेज संघटना अनेक नेत्यांचा सुद्धा सहभाग असुन ज्यात दलित पॅथरचे नेते गंगाधर गाडे, प्रा.दत्ता भगत, प्रा.बा.ह.कल्याणकर, प्रा.सुधीर गव्हाणे इत्यादींनी सुद्धा ह्या नामांतर चळवळीबद्दल आपापले मत व्यक्त करुन सहजार्य जेले.

अशा प्रकारे प्रस्तुत प्रकरणात नामांतराची चळवळ ही डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या मरणोत्तर सुरू झाली असली तरी ह्या चळवळीत अनेक आंबेडकरांच्या विचारांच्या अनुयायांनी ,संघटना, नेत्यांनी सहभाग घेतला व नामांतराची चळवळ अधिक व्यापक अशा रितीने केली हे सिद्ध करण्यासाठीची तजवीज प्रस्तूत प्रकरणात केली आहे.

प्रज रज - ५ वे

नांदेड जिल्ह्यातील नामांतर चळवळ :-

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या मरणोत्तर त्यांच्या शैक्षणिक कार्याची चळवळ पाहता डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे एक प्रकांड शिक्षणतज्ञ असुन त्यांच्या शैक्षणिक कार्यातुन मिळालेल्या प्रेरणेची ही निर्माण झालेली नामांतराची चळवळ होय. अगोदर म्हणजेच १९५८ ला स्थाप-ा झालेल्या मराठवाडा विद्यापिठास डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे नाव देण्यात यावे अशी मागणी पुढे करुन दलित संघटनांनी १९७७ नंतर नामांतर आंदोलन सुरू झाले. ह्या नामांतर आंदोलनाची चळवळ मराठवाड्यातील सर्वच जिल्ह्यात पसरली ज्यात ह्या चळवळीचा प्रसारामुळे अनेक संघटना,अनेक व्यक्तींनी सहभाग घेतला असुन त्यांपैकी मराठवाड्यातील इतर जिल्ह्याप्रमाणेच "-ांदेड जिल्ह्यातील नामांतर चळवळ" या घटकास सद्धा अतिशय महत्व असुन प्रस्तूत संशोधनात हे प्रकरण संशोधन विषयाच्या शिर्षकास अनुसरून आहे. म्हणुनच ह्या प्रकरणात नांदेड जिल्ह्यात हि चळवळ आणि प्रसार त्यात जिल्ह्यातील अनेक संघटना व अनेक व्यक्तीनी आपला सहभाग दिला ज्यात २४ सप्टेंबर रोजी नांदेड बंदला दलित पॅथरने नामांतरासाठी नांदेड बदं चे अवाहन करुन मोर्चाद्वारे जिल्ह्याधिकाऱ्यांना निवेदन दिले. नांदेड मधील किनवट या तालुक्यात सुद्धा मोर्चा झाला तर नांदेड मधील पिपल्स कॉलेज मधील युवकांनी सुद्धा प्रेरणा घेवुन मोर्चा केला. नांदेड मधील कहाळा खुर्द, धनेगाव,कृष्णुर,सुगाव,

नायगाव, टेभुंर्णी,जांब,नळदुर्ग इत्यादी गावांचा समावेश होता. तर ह्या नामांतर चळवळीच्या २७ जुलै ते १० ऑगस्ट ह्या काळात १५२५० व्यक्तींना झळ बसली १७३ दलित गंभीररित्या जखमी झाले. तर नांदेड मधील सुगावचे - जनार्धन पोवाडे, टेभुंर्णीचे - पोचीराम कांबळे, जळकोटला - पि.एस.आय. भुरेवार यांना ठार मारले. बोलसा येथे दलित महिलांवर बलात्कार करण्यात आला. मराठवाड्यातील १६९ खेड्यात दंगल उसळली. २ कोटी ७ लाख ६७ हजार ३९० रुपयाच्या मालमत्तेची होळी झाली. अशा प्रकारे ह्या नामांतर चळवळीची व्यापकता होती. तर प्रस्तूत व्यापकतेची जाणीव इतर जिल्ह्याच्या अवस्थेप्रमाणेच “नांदेड जिल्ह्यातील नामांतर चळवळ” ह्या ५ व्या प्रकरणाचे अध्ययन केले आहे.

प्रज रज - ६ वे

उपसंहार :-

प्रस्तूत संशोधनाच्या प्रबंधातील रूपरेषेनूसार प्रकरण ६ वे हे उपसंहाराचे म्हणजे मराठवाडा विद्यापिठाच्या नामांतर चळवळीत नांदेड जिल्ह्याचे योगदान एक ऐतिहासीक अभ्यास ह्या विषयाला अनुसरून संशोधन करीत असतांना संशोधनातून पुढिल काही महत्वपुर्ण निष्कर्षात्मक मुद्दे अभ्यासा अंती लक्षात आले / आढळुन आले आहेत.

१) डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे प्रकांड फायदे पंडीत तसेच ज्ञानवंत शिक्षणतज्ञ होते. ज्यांनी आपल्या ज्ञानाच्या, शिक्षणाच्या बळावर समाजातील दील - दलित घटकांपर्यंत शिक्षणाची ज्योत जागृत केली व शिक्षण ह्या महत्वपुर्ण घटकाने समाजाची सर्वांगीण विकासाची कार्ये पार पाडली.

२) डॉ.बाबासाहेब आंबेडकर - शिजज - समाज उद्धार हे सुत्र येथे तयार होते. ज्यातुन समाजात उच्च शिक्षणाची प्रेरणा मिळाली व समाजात एक जागृती निर्माण झाली.

३) सामाजिक जागृती आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्याबद्दलची जाणीव हीच मराठवाडा विद्यापिठाच्या नामांतराची चळवळ निर्माण होण्यास कारणीभूत होती. ज्यातुन उच्च शिक्षण घेण्याचा हक्क प्रत्येक जनमाणसात निर्माण होवु लागला.

४) ह्याच नामांतराच्या चळवळीस अधिक व्यापकता मिळण्यास किंवा मिळवुन देण्यासाठी अनेक सुधारकांनी , अनेक संघटनांनी विशेष सहभाग नोंदवला त्यातूनच २६ जून १९७४ रोजी मराठवाडा रिपब्लीकन विद्यार्थी संघाने मुख्यमंत्र्यांना पत्र पाठवून मराठवाडा विद्यापिठाचे नामांतर करण्याची मागणी केली तर मराठवाडा विद्यापिठास डॉ.बाबासाहेब आंबेडकर नाव द्यावे अशी जाहीर मागणी प्रथमतः पॅंथरचे सरचिटणीस गंगाधर गाडे यांनी ७ जुलै १९७७ रोजी केली असुन ह्या नामांतराच्याचळवळीत औरंगाबाद, उस्मानाबाद, बीड, गंगाखेड,अंबाजोगाई इत्यादी ठिकाणाच्या सुधारकांनी व्यक्तींनी महत्वपुर्ज भुमिका बजावून नामांतर चळवळीस व्यापकता प्राप्त करुन दिली. त्याच प्रमाणे नांदेड जिल्ह्याने सुद्धा आपली भुमिका बजावली असून नांदेड मधील सुगांव, टेंभुर्णी , जळकोट, जांब, बोलसा,किनवट इत्यादी ठिकाणी अनेक दंगली घडुन आल्या ज्यास अधिक व्यापक स्वरुप जातीय स्वरुपाचे होते. तर सुगांवचे - जनार्धन पोवाडे, टेंभुर्णीचे - पोचीराम कांबळे इत्यादी व्यक्तींनी नामांतर चळवळीत सहभाग घेवून आपल्या भूमिकेने नामांतर चळवळीस व्यापकता प्राप्त करून दिली. आणि हेच प्रस्तूत संशोधनाद्वारे विवेचन करण्यात आले आहे.

संदर्भग्रंथ

अस्मितादर्शन :-

१) नामांतर समता संघर्षाचे नवे पर्व - प्रा.नरेन्द्र कुभडे

२) मराठवाडा विद्यापिठ नामांतर विरोधी आंदोलन - पी.इ.सोसायटी आर. दै.सकाळ ,

दै.महाराष्ट्र टाईम्स,

दै.लोकमत , दै.लोकसत्ता

३) स्टेअररिंग यू ट्रब वॉटर्स - मेमोरिअयल ऑफ व व्हाईस चान्सलर - डॉ.वी.बा.गुघे

४) नामांतर पर्व रतन कुमार पंडागळे

नामांतर लढा -

५) दलित पॅंथर चळवळ लता मुरूगकर

६) विद्यापिठ नामांतर आणि आम्ही - अनंतराव भालेराव

नवशक्ती -

मराठवाड्यातील दंगली Reference no - ४०

७) मराठवाड्याची दंगल काही प्रश्न. काही उत्तरे - लो.सी.चौधरी

मराठवाड्यातील दलित चळवळ हैद्राबाद मुक्ती आंदोलन -

८) महाराष्ट्रातील समजासुधारणेचा इतिहास - भिडे , पाटील

९) अधुनिक महाराष्ट्र - सरदेसाई

१०) आंबेडकरी चळवळीचा इतिहास - आढाळ

११) महाराष्ट्रातील आंबेडकरी चळवळीचा इतिहास - डॉ.अनिल सिंगारे , डॉ. विठ्ठल घुले.

१२) नामांतर आंदोलन - डॉ. राजेद्र शिंदे